# डॉ. प्रकाश कांकरियांचा परिचय

डॉ. प्रकाश कांकरिया हे महाराष्ट्रातील अहमदनगरचे एक सुप्रसिध्द आंतरराष्ट्रीय किर्तीचे नेत्रतज्ञ आहेत. ते आपल्या लेसर ऑपरेशन, नेत्ररोपणाचे ऑपरेशन आणि मोतिबिंदूच्या ऑपरेशनच्या कौशल्याने देशात आणि परदेशातही प्रसिध्द आहेत. दि. १५ ऑगस्ट १९८५ रोजी स्थापन झालेल्या साई सूर्य नेत्रसेवा (संशोधन आणि प्रशिक्षण) संस्थेचे ध्येय म्हणजे सर्व अत्याधुनिक नेत्र उपचार पध्दती सर्वांना कमीत कमी खर्चात व आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवून देण्याची आहे. आणि जास्तीत जास्त ग्रामीण भागात सदरहु सेवा उपलब्ध करून देण्या बाबत त्यांचा प्रयत्न आहे. जेणेकरून गरीबातील गरीब आणि दुर्लक्षित व दुर्लभ घटकास अशा सोयी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या पत्नी डॉ. सौ. सुधा कांकरिया याही आपल्या पतीच्या कार्यात आपल्या हाता खालील तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने सुमारे ३० वर्षापासून हातभार लावत आहे. त्यांच्या अविरत कार्यामुळे नेत्रसेवा हे नेत्रचिकित्सा केंद्र नावारूपास आले आहे.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आपली नेत्र विशारद पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी सिव्हिल हॉस्पिटल, अहमदनगर येथे ३ वर्षे नोकरी केली. या काळात त्यांनी पुष्कळशा गरीब रूग्णांची विविध शिबीराद्वारे सेवा केली. या काळात या विषयावरील जास्तीत जास्त ज्ञान व कौशल्य प्राप्त करून त्याद्वारे सेवा करण्याची संधी प्राप्त केली. १५ ऑगस्ट १९८५ साली अहमदनगर येथे 'साई सूर्य नेत्रसेवा' या संस्थेची स्थापना केली.

आंतरराष्ट्रीय सुप्रसिध्द रशियाचे नेत्रतज्ञ डॉ. फेदरोव्ह यांच्या हाताखाली फेलोशिप करण्याचा त्यांना मान मिळाला. त्याद्वारे त्यांना सर्व जगात मान्यता प्राप्त झाली. डॉ. पी. एन. नागपाल (अहमदाबाद), डॉ. दलजितसिंग (अमृतरसर), डॉ. हरदिया (इंदुर), डॉ. रेड्डी (हैद्राबाद) या सारख्या दिग्गजांबरोबर त्यांना सुरूवातीच्या काळात काम करण्याची संधी प्राप्त झाली. आपल्या सेवेत वेगवेगळया प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याच्या लालसेमुळे त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेवून नेत्र चिकित्सांची आणि चष्मा दूर करून किंवा दृष्टीतील दोष दूर करून युवकांना नवीन दृष्टी देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या सर्व कार्यात डॉ. चार्ल्स कॅसबीर, डॉ. जॉर्ज वॅरिंग (अमेरिका), डॉ. पॅलिकॅरिस (ग्रीस), डॉ. ऑर्थर लिम (सिंगापुर) या काही सुप्रसिध्द डॉक्टरांनी त्यांना नेहमीच प्रतिसाद दिला.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी रेडिअल कॅरेटोमी आणि इंट्रा ऑक्युलर, नेत्ररोपण शस्त्रक्रियेत सन १८८५ पासुन भारतभर ख्याती प्राप्त केली आहे. सन १९८८ पासुन फॅको इमल्सीफिकेशन शस्त्रक्रकया सुरू केली व ती भारतात सर्वत्र नावारूपास आली. त्यांनी भारतात लॅसिक पध्दतीने सन १९९४ पासुन सॉलिड स्टेट रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीचा उपयोग सुरू केला. त्यांची या बाबतची भुक वाढत गेली व सन १९९५ पासुन त्यांनी महाराष्ट्रातील पहिली खाजगी मानकन्हैय्या (नेत्रपेढी) आय बँक स्थापना केली. त्याद्वारे त्यांनी देशभर लोकांमध्ये मरणोत्तर दृष्टीदानाचे महत्व पटविले.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी जवळजवळ ४४०० नेत्ररोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये मानकन्हैय्या नेत्रपेढीला सर्वोत्कृष्ट नेत्रपेढीचा सन्मान मिळाला आहे. डॉ. कांकरिया हे महाराष्ट्र ऑफ्थॅल्मिक सोसायटीचे माजी अध्यक्ष आहेत तर अखिल भारतीय रिफ्रॅक्टीव्ह सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष व अमेरिकन नेत्रतज्ञ संघटनेचे, युरोपियन सोसायटी मोतिबिंदू आणि दृष्टीदोष सर्जरी सोसायटी, आंतरराष्ट्रीय दृष्टीदोष सर्जरी, आशिया पॅसिफिक नेत्रतज्ञ सोसायटी आणि जागतिक नेत्रतज्ञ कॉँग्रेस सभासद ही आहेत.

आपल्या प्रसिध्दिचे शिखर पादाक्रांत करतांना डॉ. प्रकाश कांकरिया यांनी अनेक शिबीरे सर्व स्तरातील शहरामधुन भारतात आयोजित केली. ज्यांचे विवाह दृष्टी अभावी थांबललेले आहेत अशा युवतींसाठी विवाहदृष्टीभेट

योजना आणली. त्याद्वारे हजारो व्यक्ती ज्यांच्या डोळयामध्ये दोष आहेत किंवा ज्यांना चष्म्यामुळे विवाहास अडथळा निर्माण होतो. अशा रूग्णांना आपल्या मोबाईल दृष्टी उपचार साईदृष्टी यात्राद्वारे विविध ठिकाणी जाऊन दृष्टीचा लाभ दिला आहे. सदरहू सुसज्ज असलेल्या या व्हॅनमध्ये सुसज्ज उपकरणे व तज्ञ उपचारक यांच्या मदतीने विनामुल्य दृष्टी शिबीराचे प्रत्येक आठवडयामध्ये आयोजन केले जाते. यात डोळयांसंबधीच्या आणि मोतीबिंदूच्या ऑपरेशनचे आणि विशेष करून स्वातंत्र्य सैनिकांची त्यांच्या स्वराज्याच्या सहभागार्थ विनामुल्य सेवा केली जाते.

डॉ. प्रकाश कांकरिया हे बहुदा जगातील काही डोळयाचे सर्जन पैकी एक असावेत की त्यांनी आपल्या ३० वर्षांच्या कारकिर्दीत जवळ जवळ दोन लाखापेक्षाही जास्त दृष्टीदोष नाहिसे केले असतील. त्यांनी एकाच दिवसात १०० पेक्षा जास्त लॅसिक ऑपरेशन असे ४८ वेळा करीत जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत. वेव्हलाईट जर्मन यांनी जगातील अत्यंत जलद सर्जन असा किताब देवून लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस् मध्ये त्यांचे नांव प्रसिध्द केले आहे. या रेकॉर्डला मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची व मा. मुख्यमंत्री आणि मा. स्वास्थमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. अध्यक्ष अखिल भारतीय नेत्रतज्ञ संघटना यांच्याकडून मान्यताप्राप्त झाली आहे. आपल्याकडे आपल्या संग्रहात जवळ जवळ ८००० निमंत्रण पत्रिका विविध वधुकडून प्राप्त झाल्याचे ते सांगतात व त्या सर्वांनी आपले विवाहास त्यांच्या नेत्रशस्त्रक्रियेमुळेच लाभ झाला असल्याचे आवर्जुन म्हटले आहे.

मा. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी प्रस्थापित केलेल्या ग्लोबल आय बँकिंगला पाठिंबा देऊन त्यात संशोधन करून तो अधिकाधिक कार्यक्षम करण्याचा निर्धार त्यांनी केला. डॉ. प्रकाश कांकरिया हे जगातील असे दुर्मिळ नेत्रतज्ञ आहेत ज्यांनी आपल्या वडीलांचे व आईचे मरणोत्तर नेत्रदान स्वत: केले व अंध रूग्णांवर नेत्ररोपणही केले. भारतात प्रथम व मुस्लिम समाजाने नेत्रदानाचे संकल्पपत्र भरून देऊन डॉ. कांकरिया यांच्या कार्याचा वेगळा गौरवही केला आहे. डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आपल्या विविध पैलूद्वारे आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास केला आहे. त्यांनी १०० एकरपेक्षा अधिक पडिक आणि निर्जन खडकाळ जमिनीतून 'साईबनची' स्थापना केली आणि औद्योगिक वाया जाणाऱ्या पाण्यावर त्या जमिनीचा विकास करून हिरवळीचे स्वरूप देऊन नंदनवन उभे केले म्हणुन या कामाला वनश्री हा किताब देऊन महाराष्ट्र सरकारने त्यांना बहुमान दिला आणि भारत सरकारनेही त्याला मान्यता दिली. इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे सेक्रेटरी म्हणुन काम पाहत आहेत आणि इंडियन मेडिकल असोसिएशन सुवर्ण महोत्सवी वर्षात अध्यक्षस्थानी असतांना त्यांचा राज्यस्तर बहुमान केला गेला. रोटरी क्लबच्या अध्यक्षस्थानी असतांना त्यांनी अंधासाठी एक कॉलनीची स्थापना केली. व आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाले. डॉ. कांकरिया यांनी फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणुनही काम पाहिले.

आनंदऋषिजी हॉस्पिटल आणि हार्ट सर्जरी सेंटर या २०० बेडच्या मेडिकल सेंटरचे डायरेक्टर, मानकन्हैय्या पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट आणि आय बँक यांचे ते अध्यक्षस्थान भुषवितात. मराठवाडा मित्रमंडळाचे अध्यक्ष असून निसर्ग या क्लबचेही अध्यक्ष आहेत. त्यांनी पुणे आणि मुंबई येथे डोळयांची निगा राखणाऱ्या केंद्राची उभारणी केली. त्यांची कर्म करण्यावर श्रध्दा असून साईबाबा यांच्यावर त्यांची अनन्य भक्ती आहे. खेळ, संगीत, चित्रकला, प्रवास हा त्यांचा छंद आहे.

---

**Dr Prakash Kankaria** Sai Surya Netra Seva Manik Chowk, Ahmednagar
Phone 0241 2341417 Email saisuryaa85@yahoo.com
Visit us at : www.saisuryasupervision.com